# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७)विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४(१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

**(आस्थापना व प्रशासन विभाग)**

एम. आय. डी. सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली ४४२६०५

email :- gug.registrar@gmail.com दुरध्वनी क्र. ०७१३२-२२३१०४ email:- establishment.section@unigug.ac.in


जा.क्र. गो.वि./आस्था./ ४२८ /२०२२ दि. ०९/०२/२०२२

## परिपत्रक

विषय :- भारतरत्न गानसम्राज्ञी लता मंगेशकर यांना अभिवादन करणेसाठी आयोजित सभेमध्ये सहभागी होणेबाबत.

संदर्भ :- शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण), पुणे यांचे पत्र क्र. उशिसं/अभिवादन सभा/२०२२/मवि-१/७२२७, दि. ०९/०२/२०२२

गोंडवाना विद्यापीठातील सर्व संविधानिक अधिकारी, अधिकारी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांचे मा. प्राचार्य यांना याद्वारे कळविण्यात येते की, भारतरत्न गानसम्राज्ञी लता मंगेशकर यांचे रविवार दि. ०६/०२/२०२२ रोजी दु:खद निधन झाले. त्यांच्या निधनामुळे संगीत व कला विश्वाची अपरिमित हानी झाली आहे.

भारतीय संगीत विश्वातील दिदींचे योगदान अतुलनीय असुन महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासावर त्यांनी आपल्या कामगीरीने अमीट मुद्रा उमटवलेली आहे.

या महान गायिकेला श्रध्दांजली वाहण्यासाठी मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांच्या उपस्थितीत दि. १०/०२/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता रुईया महाविद्यालय, मुंबई येथे अभिवादन सभेचे आयोजन करण्यात आले आहे.

त्याअनुषंगाने संबंधितांना संदर्भिय पत्रामध्ये नमुद युट्युब वा फेसबुक लिंकवरुन सदरहू सभेत सहभागी होता येईल किंवा खाली दिलेल्या क्युआर कोड स्कॅन करुन सुध्दा सहभागी होता येईल.

युट्युब लिंक क्युआर कोड

फेसबुक लिंक क्युआर कोड

करीता सर्व संबंधितांनी अभिवादन सभेत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांचा तपशील संदर्भिय पत्रातील विवरणपत्रानुसार न चुकता विनाविलंब विद्यापीठाकडे सादर करावा.

संलग्न - वरीलप्रमाणे.

मा. कुलसचिव महोदयांच्या आदेशान्वये

(डॉ. विजय सिलारे) ९-२-२०२२

उपकुलसचिव

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**प्रतिलिपी :-**

१. मा. कुलगुरू महोदयांचे स्वीय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
२. मा. प्र-कुलगुरू महोदयांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
३. मा. कुलसचिव महोदयांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

४. मा. सहसंचालक (उच्च शिक्षण), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे- ०१
५. मा. प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना उचित कार्यवाहीस्तव सविनय सादर.
६. मा. विभाग प्रमुख, सर्व पदव्युत्तर शैक्षणिक विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना कार्यवाहीस्तव सविनय सादर.
७. मा. संचालक, विद्यार्थी विकास विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना कार्यवाहीस्तव सविनय सादर.
८. मा. संचालक, राष्ट्रीय सेवा योजना, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना कार्यवाहीस्तव सविनय सादर.
९. सर्व प्रशासकिय/शैक्षणिक विभागांचे मा. विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांनी सदरहू परीपत्रक आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व अधिकारी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणून द्यावे.
१०. मा. मुख्य कार्यक्रम अधिकारी, एस.टी.आर.सी. गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली यांना माहितीस्तव सादर.
११. सिस्टीम ॲनालिस्ट, संगणक विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना सुचित करण्यात येते की, सदर परिपत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.
१२. आस्थापना विभाग(नस्ती), गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

(डॉ. विजय सिलारे)
उपकुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११००१.
Web:www.dhepune.gov.in E-mail : mavi.dhepune@nic.in
फोन नं. ०२०/२६०५१७२९, २६०५१५१२,

क्रमांक- उशिसं/अभिवादन सभा/२०२२/मवि-१ / 7227 दि. ०९/०२/२०२२
- 9 FEB 2022

प्रति,

कुलसचिव,
सर्व अकृषी विद्यापीठे/अभिमत विद्यापीठे/स्वयंअर्थसहायित विद्यापीठे
सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य

**विषय : भारतरत्न गानसम्राज्ञी लता मंगेशकर यांना अभिवादन करणेसाठी आयोजित सभेमध्ये सहभागी होणेबाबत**

उपरोक्त विषयाबाबत कळविण्यात येते की, भारतरत्न गानसम्राज्ञी लता मंगेशकर यांचे रविवार दि. ०६.०२.२०२२ रोजी दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनामुळे संगीत व कलाविश्वाची अपरिमित हानी झाली आहे

भारतीय संगीत विश्वातील दिदींचे योगदान अतुलनीय आहे. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासावर त्यांनी आपल्या कामगिरीने अमीट मुद्रा उमटविलेली आहे.

या महान गायिकेला श्रध्दांजली वाहण्यासाठी मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण महाराष्ट्र राज्य यांच्या उपस्थितीत **दि १०.०२.२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता** रुईया महाविद्यालय, मुंबई येथे अभिवादन सभेचे आयोजन करण्यात आले आहे. सदरहू सभेसाठी विद्यापीठीय/महाविद्यालयीन शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचारी व उच्च शिक्षण घेणा-या सर्व विद्यार्थ्यांना युटयुब तसेच फेसबुकच्या माध्यमातून या अभिवादन सभेत सहभागी होता येईल. युटयुबची लिंक पुढीलप्रमाणे-

https://youtube.com/channel/UCP2tl2ByPMnxnVgtsmNWYjA

फेसबुक लिंक पुढीलप्रमाणे -
https://www.facebook.com/udayravindrasamant/

विद्यापीठांनी सर्व विद्यार्थ्यांना युटयुब लिंक विद्यार्थ्यांच्या भ्रमणध्वनीवर देण्याची व्यवस्था करावी. अभिवादन सभेत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांचा तपशील खालील विवरणपत्रात विभागीय सहसंचालक उच्च शिक्षण यांचेकडे एकत्रित स्वरुपात देण्यात यावा.

| अ.क्र. | महाविद्यालय | एकूण विद्यार्थी संख्या | सभेत सहभागी विद्यार्थी |
|---|---|---|---|
| | | | |

विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांनी आपल्या विभागाचा एकत्रित अहवाल संचालनालयास दि.१०.०२.२०२२ रोजी दुपारी १.०० वाजेपर्यंत निश्चितपणे सादर करण्यात यावा.

सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच विद्यार्थी या अभिवादन सभेत सहभागी होतील यासाठी आपले कार्यक्षेत्रातील सर्व महाविद्यालये व विद्यार्थी यांना आपले स्तरावरुन स्वतंत्रपणे अवगत करावे. संचालक, राष्ट्रीय सेवा योजना व संचालक, विद्यार्थी विकास मंडळ यांनी यासाठी विद्यार्थ्यांपर्यंत युट्युब लिंक पोहोचविण्याची विशेष दक्षता घ्यावी.

सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांनी आपल्या विभागातील सर्व अकृषि विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे, स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे तसेच संलग्नित महाविद्यालयांना आपल्या स्तरावरुन स्वतंत्र कळविण्यात यावे.

(डॉ.प्रकाश बच्छाव)
सहसंचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रत माहितीस्तव सादर

१.मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-३२
२.स्वीय सहायक, मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई-३२
३. स्वीय सहायक, मा.राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई-३२